# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:31.12.2024** **वारःमंगळवार**

---

ठळक बातम्या
- अंतराळात दोन उपग्रहांची जोडणी करण्यासाठीच्या स्पेडेक्स मोहिमेचं इस्रोकडून यशस्वी प्रक्षेपण
- प्राप्तीकराविषयी विवाद सोडवण्यासाठीच्या विवाद से विश्वास योजनेला मुदतवाढ
- नववर्षाच्या स्वागतासाठी विविध पर्यटनस्थळांवर गर्दी; प्रशासनही सज्ज आणि
- कन्याकुमारीत भारतातल्या समुद्रावरील पहिल्या काचेच्या पुलाचं काल उद्घाटन

इस्रो
भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोनं आपल्या स्पेडेक्स मोहीमेअंतर्गत काल श्रीहरीकोटा इथल्या उपग्रह प्रक्षेपक तळावरुन दोन उपग्रह अवकाशात सोडले. या मोहिमेअंतर्गत अंतराळात दोन उपग्रहांची जोडणी अर्थात डॉकिंग करण्यात येणार आहे. काल एसडीएक्स 01 आणि एसडीएक्स 02 हे दोन्ही उपग्रह पृथ्वीपासून काही अंतरावरील आपापल्या कक्षांमध्ये स्थिरावले, आगामी काही दिवसात दोन्ही उपग्रहांमधील अंतर कमी होईल आणि त्यानंतर डॉकिंगची प्रक्रिया सुरू होईल, असं इस्रोचे अध्यक्ष एस सोमनाथ यांनी सांगितलं. चंद्रयान मोहीम आणि भारतीय अंतरिक्ष स्थानकासारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमांसाठी स्पेडेक्स मोहीम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या मोहीमेच्या यशानंतर, अंतराळात दोन उपग्रह एकमेकांशी जोडणं अथवा विलग करण्याचं तंत्रज्ञान विकसित केलेला भारत जगातला चौथा देश ठरेल.

प्रत्यक्ष करमुदत
केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळानं विवाद से विश्वास या योजनेला 31 जानेवारी 2025 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्राप्तीकर विभागासंदर्भात करदात्यांचे असलेले विवाद सोडवण्याच्या उद्देशाने, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी योजनेची घोषणा केली होती. करदात्यांना ठराविक टक्केवारीसह विवादित रक्कम भरून करदायित्वाची पूर्ती करण्याच्या दृष्टीनं ही योजना आखण्यात आली आहे. योजनेला मिळालेल्या मुदतवाढीमुळे करदात्यांना कराची देय रक्कम निश्चित कऱण्यास तसंच कर भरण्यास अवधी मिळणार आहे.

निर्मला बैठक

आगामी 2025-26 या आर्थिक वर्षासाठीच्या केंद्रीय अर्थसंकल्पाच्या पार्श्र्वभूमीवर विविध क्षेत्रातील तज्ज्ञ आणि प्रतिनिधींशी विचारविनिमय करण्यात येत आहे. त्याअंतर्गत काल नवी दिल्लीत अर्थमंत्री निर्मला सीतारामन  यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या सहाव्या अर्थसंकल्पपूर्व बैठकीत आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रांबाबत चर्चा करण्यात आली.  वित्त तसंच आर्थिक व्यवहारविषयक विभागाचे सचिव,केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार तसंच आरोग्य आणि शिक्षण विभागांचे सचिवही या बैठकीला उपस्थित होते. तत्पूर्वी  काल अगोदर त्यांनी उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींबरोबर सल्लामसलत केली.

डीजी यात्रा
करचोरी करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी डिजी यात्रेच्या माहितीचा वापर केला जाणार असल्याच्या माध्यमांमध्ये प्रसारीत होत असलेल्या बातम्या  सरकारनं फेटाळल्या आहेत. या संदर्भातले अहवाल निराधार आणि चुकीच्या माहितीवर आधारित आहेत असं  नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं म्हटलं आहे. मंत्रालयाकडून प्रवासी माहिती कर विभागाकडे सामायिक केली जात नाही, असं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

आर टी जीएस
आरटीजीएस अथवा एनईएफटी या बँकिंग प्रणालीचा वापर करून ऑनलाईन पद्धतीनं बँक खात्यात पैसे जमा करणाऱ्या व्यक्तींना व्यवहार करण्यापुर्वी संबंधित लाभार्थ्याच्या बँक खात्यावर नोंदवलेल्या नावाची पडताळणी करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी असे निर्देश भारतीय रिझर्व्ह बँकेने दिले आहेत. येत्या एक एप्रिल 2025 पर्यंत ही सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी सूचनाही रिझर्व्ह बँकेनं केली आहे. या सुविधेमुळे योग्य व्यक्तिला पैसे हस्तांतरण होत असल्याचा निर्वाळा मिळेल तसंच फसवणुकीची शक्यताही कमी होईल असं रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहे.

नव वर्ष स्वागत
आज 31 डिसेंबर सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षाचं स्वागत करण्याचा दिवस. नव्या वर्षाचं उत्साहात आणि जल्लोषात स्वागत करण्यासाठी नागरिक उत्सुक असून विविध पर्यटन स्थळ नागरिकांनी फुलून गेली आहेत. तिथल्या प्रशासनानंही यासाठी जय्यत तयारी केली आहे. मुंबईतल्या समुद्र किनाऱ्यांवर रात्रीच्या वेळी येणाऱ्या प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट विविध बसमार्गांवर रात्री 25 जादा बसगाड्या सोडणार आहे. तसंच नागरिकांना दक्षिण मुंबईतील विविध ऐतिहासिक तसंच प्रेक्षणीय स्थळांचा फेरफटका नवीन वातानुकूलित दुमजली इलेक्ट्रिक बसद्वारे घडवण्याच्या हेतूनं बेस्टतर्फे आज हेरिटेज टूर चालवण्यात येणार आहेत. नवीन वर्ष स्वागताच्या पार्श्वभूमीवर, पुण्यात 3 हजार पोलीस-अधिकारी कर्मचारी आणि 700 वाहतूक पोलीस तैनात करण्यात येणार आहेत. शहरात 23 ठिकाणी तपासणी करण्यात येणार आहे. पहाटे पाच वाजेपर्यंत मद्याची दुकानं सुरू ठेवण्याला परवानगी आहे. या संबंधीच्या नियमांचं पालन न करणाऱ्या पब

आणि हॉटेल्सवर कारवाई केली जाईल, असा इशारा पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

रशिया- युक्रेन कैदी

संयुक्त अरब अमिरातीच्या मध्यस्थीनंतर, रशिया आणि युक्रेन यांच्या दरम्यान हजारो युद्धकैद्यांची सुटका करण्यात आली. रशियन संरक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, उभय देशांनी परस्परांच्या प्रत्येकी दीडशे लष्करी युद्धकैद्यांची सुटका केली. युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेंक्सी यांनी 189 युक्रेनी नागरिक घरी परतल्याची माहिती दिली आहे. यामध्ये अझोव्हस्टार आणि मारियुपोलच्या बचाव सैनिक तसंच चेर्नोबिल अणु उर्जा संकल्प आणि स्नेक बेटांचाही समावेश आहे. रशियानं मे 2022 रशियानं दक्षिण-पूर्व युक्रेनमधील मारियुपोलवर महिन्याभराच्या संघर्षानंतर विजय झाल्याची घोषणा केली होती. तर 2022 च्या फेब्रुवारीमध्ये रशियन सैन्यानं चेर्नोबिलवर ताब्यात घेतलं होतं.

नेपाळ भारत लष्करी सराव

भारत-नेपाळ दरम्यानच्या 18 वा सूर्यकिरण या संयुक्त लष्करी सरावाला आजपासून नेपाळमध्ये प्रारंभ होत आहे. या सरावात जगंलातले युद्ध, तसंच कठीण भूप्रदेशात दहशतवादाचा प्रतिकार तसंच आपत्ती व्यवस्थापनात मानवतावादी मदत यावर लक्ष केंद्रीत केलं जाणार आहे.  भारतीय लष्कराची 11 वी गोरखा रायफल तुकडी आणि नेपाळ लष्करातली श्री जंग बटालियन यांच्यादरम्यान दोन आठवड्यांच्या सरावात सहभागी होणार आहेत. या सरावामुळे, उभय देशांतील व्यावसायिक सहकार्य, मैत्रीपूर्ण संबंध आणि विश्वास तसंच सांस्कृतिक संबंधांचा विस्तार होण्याची अपेक्षा आहे.

भारत संरक्षण

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना अर्थात डीआरडीओच्या एआयपी प्रणालीच्या एअर इंडिपेंडंट प्रोपल्शन प्लगची उभारणी आणि त्याचं भारतीय पाणबुड्यांचं एकीकरण तसंच इलेक्ट्रॉनिक हेवी वेट टॉर्पेडोच्या कलवरी श्रेणीच्या पाणबुड्यांशी एकत्रीकरणासंबंधीच्या सुमारे 2 हजार 867 कोटी रुपयांच्या दोन करारांवर काल संरक्षण मंत्रालयाच्या वतीनं स्वाक्षरी करण्यात आली. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली इथं दोन्ही करार करण्यात आले. त्यामध्ये एआयपी प्लगचं बांधकाम आणि त्याच्या एकत्रीकरणासाठी मुंबईच्या माझगांव शिपबिल्डर्स लिमिटेडशी करण्यात आलेल्या सुमारे 1हजार 990 कोटी रुपयांच्या कराराचा समावेश आहे. दुसरा अंदाजे 877 कोटी रुपयांचा करार फ्रान्सच्या नेव्हल ग्रुपबरोबर करण्यात आला.

बांग्लादेशी दहशतवादी

बंगळुरूच्या विशेष न्यायालयानं, जहिदुल इस्लाम उर्फ कौसर याला बांग्लादेशी दहशतवाद्याला सात वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. त्याला कट रचणे, लुटणे आणि दारूगोळा खरेदी या गुन्ह्यांमध्ये 57 हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला आहे. बांग्लादेशात साखळी स्फोट घडवून आणल्यानंतर या आरोपीनं भारतात घुसखोरी केल्याचं तपासात उघड झालं. 2018 मध्ये बोधगयातील बॉम्बस्फोट आणि 2014 मधल्या बर्दवान बॉम्बस्फोट प्रकरणात त्याचा हात असल्याचं तसंच भारत आणि बांग्लादेशात जमात उल मुजाहिदीन यांच्याशी निगडीत कारवायांना प्रोत्साहन देण्याच्या प्रकरणातही त्याचा सहभाग सिद्ध झाल्यानंतर न्यायालयानं हा आदेश दिला आहे. या प्रकरणांमध्ये एकंदर 11 आरोपींना दोषी ठरवण्यात आलं आहे.

दिल्ली पोलिस स्थलांतरीत

दिल्ली पोलिसांनी शहराच्या विविध भागातून बेकायदेशीररित्या स्थलांतरीत झालेल्या 12 बांग्लादेशी नागरिकांना ताब्यात घेतलं आहे. अटक केलेल्या स्थलांतरीतांना निर्वासित शिबिरांमध्ये पाठवण्यात आल्याची माहिती दिल्ली पोलिसांनी दिली आहे. दिल्ली पोलिसांनी बाराशे लोकांची तपासणी केल्याचंही पोलिस उपायुक्त रवी कुमार सिंह यांनी सांगितलं.

तामिळनाडू काचपूल

तामिळनाडू राज्यातल्या प्रसिद्ध पर्यटनस्थळ असलेल्या कन्याकुमारीच्या सौंदर्यात आणखी एका स्थळाची भर पडली आहे. देशातल्या पहिल्या समुद्रावरील काचेच्या पुलाचं काल उद्घाटन करण्यात आलं. विवेकानंद स्मारक आणि 133 फूट उंच संत तिरूवल्लुवर यांच्या पुतळा, ज्याचे नामकरण आता ज्ञानाचा पुतळा करण्यात आलं आहे, त्याना जोडणाऱ्या या भव्य पुलाचं तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के स्टालिन यांच्या हस्ते काल उद्घाटन करण्यात आलं. 37 कोटी रुपये खर्चून बांधलेल्या 77 मीटरच्या या पुलामुळे पर्यटकांना या दोन स्थळांदरम्यान चालत जाताना, उसळणाऱ्या सागरी लाटांचा आनंद घेता येणार आहे.

नेपाळ मधमहोत्सव

नेपाळच्या बागमती प्रांतल्या सौराहा इथं आयोजित करण्यात आलेल्या पाच दिवसांच्या मध महोत्सवाचा आज समारोप होत आहे.  या महोत्सवासाठी येणाऱ्या अभ्यागतांना  सहा वेगवेगळ्या प्रकारचे मध चाखण्याची मोफत संधी देण्यात आली आहे. मधाच्या विपणनाला आणि मधमाशीपालक शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं नेपाळ सरकारनं या महोत्सवाचं आयोजन केलं आहे. या महोत्सवात लिची, चिउरी, युकॅलिप्टस, मसाले, शेवगा, सूर्यफूल, मोह अशा निरनिराळ्या वनस्पतींच्या फुलांपासून गोळा केलेले मध विक्रीसाठी ठेवण्यात आले आहेत.

फिडे बुद्धीबळ वैशाली

बुद्धिबळामध्ये फिडे बिल्ट्झ विश्वकरंडक स्पर्धेत भारताची ग्रॅंडमास्टर रमेशबाबू वैशाली, महिला विभागात नॉकऑऊट टप्प्यासाठी पात्र ठरली. अकरा फेऱ्यांमध्ये साडेनऊ गुण मिळवत ती अव्वलस्थानी राहिली. या स्पर्धेत महिलांच्या आणि खुल्या विभागात पहिला अडथळा पार करणारी वैशाली एकमेव भारतीय खेळाडू होती. कॅरिसा यिप सह काल तिचा सामना बरोबरीत सुटला.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार